**नि.फौ.के. नं. ११५/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. शंकर**
**निशाण क्र. १७ लगत**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपीस रत्नागिरी मध्यवर्ती कारागृह यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ संदेश दत्ताराम कापडी यांचा उर्वरीत सरतपास शपथेवर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०५.** माझ्या दुकानातुन आईस्क्रीम दोन कप व चिल्लर चोरीला गेले होते. राजेश आंबवकर यांच्या 'दत्तकृपा मोबाईल शॉपी' या दुकानामधुन ०३ मोबाईल व मोबाईल एक्सेसरीज चोरीला गेले होते. पोलीसांनी सदर आरोपीला चौकशी करण्याकरीता आणले होते. त्यावेळी आरोपीने सदर मोबाईल दुकानामधुन व माझ्या दुकानामधुन चोरी केल्याचे त्यावेळी कबुल केले होते. आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे दिसत असलेला हा तोच आरोपी आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडुन –**

**०६.** माझे मागील २५ वर्षापासुन 'साईराज कोल्ड्रींक्स' चे दुकान आहे. माझ्या

दुकानात रोज जमा झालेल्या रोख रकमेची मी नोंदवही ठेवलेली नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, मी स्वतः दुकान चालवित असल्याने तशी नोंदवही ठेवण्याची मला आवश्यकता नाही. मोठी रक्कम रोज घरी घेवुन जावुन मी किरकोळ रक्कम दुकानामध्ये ठेवत असतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तथाकथीत चोरीच्या घटनेआधी नेमकी किती चिल्लर शिल्ल्क होती, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या दुकानामधुन आरोपीने कोणतीही चिल्लर चोरी करुन नेली नाही.

**०७**. माझ्या दुकानात शिल्लक असलेला मालाचा स्टॉक व विक्री केलेल्या मालाचा स्टॉक याची नोंदवही ठेवलेली नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, मी व माझा मुलगाच दुकान पाहत असल्याने तशी मला आवश्यकता वाटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या दुकानाचा आयकर परतावा (Income Tax Return) व जी.एस.टी. परतावा (Goods and Services Tax Return) भरतो.

०८. ***प्रश्नः*** *जी.एस.टी.परतावा भरण्यासाठी मालाची स्टॉक वही ठेवणे तुम्हाला आवश्यकता असते, हे बरोबर आहे का?*

***उत्तरः*** *होलसेल मालाचे स्टॉक नोंदवही माझ्या दुकानात ठेवलेली आहे. त्यानुसार, मी त्याबाबत जी.एस.टी. परतावा भरतो.*

**०९**. हे म्हणणे खरे आहे की, रोजचा जमा व खर्चाची नोंदवही मी ठेवतो. साक्षीदार पुढे सांगतो की, ती माझ्या घरी असते. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशीच्या मालाच्या स्टॉकची नोंदवही व जमा खर्चाची नोंदवही मी पोलीसांना दिली नाही.

**१०**. ***प्रश्नः*** *तशी नोंदवही देण्यास तुम्हाला तशी कोणतीही अडचण नव्हती, हे बरोबर का ?*

***उत्तरः*** *सदरची चोरीची तक्रार मी दिलेलीच नाही.*

**११.** हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपीने माझ्या दुकानातुन आईस्क्रीमचे दोन कप व चिल्लर चोरली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानाची तोडलेली दोन कुलुपे माझ्यासमक्ष पोलीसांनी जप्त केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, *सदरचे सी.सी.टी.व्ही. फुटेज मी पोलीसांना दिले होते व ते मला दाखविल्यास मी ओळखु शकतो*, हे मी सरतपासात खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात मी सांगितल्याप्रमाणे, आरोपीने कोणतीही चोरी केलेली नाही.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, दुकानामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावायचा झाल्यास पोलीसांकडुन परवानगी घेणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे आहे की, तशी परवानगी पोलीसांकडुन घेतल्याबाबतची प्रत मी तपासीक अधिकारी यांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा व फिर्यादीचा व्यवसाय जवळ–जवळ असल्याने त्यांच्या सांगण्यावरुन, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा नमुद केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.20 15:55:18 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

दिनांक २०/०४/२०२६
स्थळः देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 20/04/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 20/04/2026 |
| Evidence uploaded on | :- | 20/04/2026 |